# 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमात ८७ प्रकरणांवर सुनावणी

सांगली / प्रतिनिधी : बाल विवाह, हुंडाबळी, गर्भलिंगनिदान चाचणी यासह समाजातील अनेक अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरेचा महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. यासाठी महिलांनी अशा अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरेतून बाहेर पडले पाहिजे. याची सुरवात प्रत्येक महिलेने स्वतःपासून करावी, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी येथे केले.

'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या. जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या जनसुनावणीप्रसंगी अधिकारी [illegible] उपस्थित होते. चाकणकर म्हणाल्या, समाजात महिलांचे प्रश्न, समस्या अनेक आहेत. याची सोडवणूक करण्यासाठी शासन अनेक कायदे, नियम बनवते. या कायदे व नियमांची महिलांनी माहिती करुन घ्यावी.



सांगली : जनसुनावणीप्रसंगी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, जिल्हाधिकारी राजा दयानिधी, आयुक्त सुनील पवार व मान्यवर. (छाया : धामणीकर)

नियम माहीत असल्यास त्रास देणाऱ्याला आपण जाब विचारू शकतो व आपले संरक्षण करू शकतो, असे त्यांनी सांगितले. श्रीमती चाकणकर म्हणाल्या, ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या तक्रारी राज्य महिला आयोगाच्या मुख्य कार्यालयात प्रत्यक्ष मांडता येत नाहीत, यासाठी राज्य महिला आयोगामार्फत महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात जावून महिलांच्या तक्रारी, समस्यांचे निराकरण करुन त्यांना न्याय मिळवून दिला जात आहे. जन सुनावणीमध्ये दाखल झालेल्या तक्रारींचे निराकरण करुन त्या महिलांना न्याय देण्याची भूमिका आयोगाची आहे. जन सुनावणीतून महिलांचे प्रश्न, समस्या मार्गी लागतील, असा विश्वास श्रीमती चाकणकर यांनी यावेळी व्यक्त केला.

महिलांचे प्रश्न सोडवण्यास प्रशासनाने नेहमीच प्राधान्य दिले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी यावेळी सांगितले. कोरोना काळात एक पालक गमावलेल्या व दोन्ही पालक जिल्ह्यातील बालकांना मदत केल्याचे त्यांनी सांगितले. महिलांनीही त्यांच्या काही तक्रारी असल्यास प्रशासनाकडे मांडाव्यात. आवश्यक त्या ठिकाणी अशा महिलांची नावे गोपनीय ठेऊन त्यांना न्याय मिळवून दिला जाईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी प्रास्ताविक करुन महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्ज्वलनाने जनसुनावणी उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. जनसुनावणीत ८७ प्रकरणावर सुनावणी या जनसुनावणीत जिल्ह्यातील महिलांकडून प्राप्त झालेल्या ८७ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यामध्ये वैवाहिक / कौटुंबिकची ४५ प्रकरणे, सामाजिक ११ प्रकरणे, मालमत्ता संदर्भात ९ प्रकरणे, कामाच्या ठिकाणी छळ ३ आणि इतर १९ प्रकरणांचा समावेश आहे. या प्रकरणांची ३ पॅनेलद्वारे सुनावणी घेण्यात आली.

दै पुढारी

# अनिष्ट रूढी आणि प्रथेतून बाहेर पडा

## रुपाली चाकणकर यांचे आवाहन ; आयोगाकडून ८७ प्रकरणावर सुनावणी

सांगली : पुढारी वृत्तसेवा

बालविवाह, हुंडाबळी, गर्भलिंगनिदान चाचणी यासह अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरेचा महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. यासाठी महिलांनी अशा अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरेतून बाहेर पडले पाहिजे, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज येथे केले. दरम्यान, महिला आयोगाच्या जनसुनावणीत आज ८७ प्रकरणावर सुनावणी घेण्यात आली.

महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या जनसुनावणीप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलिस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, महापालिका आयुक्त सुनील पवार, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी निखील ओसवाल, महापालिका उपायुक्त स्मृती पाटील, महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार व विधी प्राधिकरणाचे अधिकारी आदी उपस्थित होते.




सांगली : अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत बोलताना रुपाली चाकणकर. शेजारी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, डॉ. बसवराज तेली आदी.

चाकणकर म्हणाल्या, समाजात महिलांचे प्रश्न, समस्या अनेक आहेत. याची सोडवणूक करण्यासाठी शासन अनेक कायदे, नियम बनवते. या कायदे व नियमांची महिलांनी माहिती करून घ्यावी. नियम माहीत असल्यास त्रास देणाऱ्याला आपण जाब विचारू शकतो व आपले संरक्षण करू शकतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी घेण्यात आलेल्या जनसुनावणीत जिल्ह्यातील महिलांकडून प्राप्त झालेल्या ८७ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. या मध्ये वैवाहिक, कौटुंबिकची ४५ प्रकरणे, सामाजिक ११ प्रकरणे, मालमत्ता संदर्भात ९ प्रकरणे, कामाच्या ठिकाणी छळ ३ आणि इतर १९ प्रकरणांचा समावेश आहे. या प्रकरणांची ३ पॅनलद्वारे सुनावणी घेण्यात आली.

यावेळी सरकारी वकील ॲड. शकील पखाली, ॲड. फारुख कोतवाल आदी उपस्थित होते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी प्रास्ताविक केले.

दै जनप्रवास

# स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी धाडी टाका : रुपाली चाकणकर यांचे आदेश

जनप्रवास । प्रतिनिधी

सांगली : गरोदर महिलांचे दिवसेंदिवस सोनोग्राफी तपासणी करण्याचे प्रमाण घटत आहे. त्याचा स्त्री-भ्रूण हत्येशी थेट संबंध असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे अशा महिलांची सोनोग्राफी करावी. आशा, ग्रामसेवक, सरकारी रुग्णालयांमार्फत गर्भलिंग तपासणी करून भ्रूण हत्या मोठ्या प्रमाणात केली जात असल्याचा संशय येत आहे. त्यामुळे जिल्ह्यात धाडी टाकून मोहीम राबविण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक सभागृहात झालेल्या जिल्हास्तरीय जनसुनावणी बैठकीनंतर त्या बोलत होत्या. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, महापालिका आयुक्त सुनील पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी [illegible], महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा पवार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी समितीची महत्त्वाची भूमिका आहे. या समितीने प्रभावीपणे काम करून जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची वेळोवेळी अचानक तपासणी करावी. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घ्यावा. तसेच, गरोदर महिलांची नोंदणी ते प्रसुती याचा पाठपुरावा करण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाने सहकार्य करावे. आशा, अंगणवाडी सेविका-मदतनीस यांच्या मदतीने माहिती घ्यावी. जेणेकरून मधल्या टप्प्यात अवैध गर्भपात झाल्यास त्यावर कारवाई करता येईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी कौशल्य विकास व महिला आर्थिक विकास महामंडळाने पुढाकार घेऊन या महिलांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे. मनोधैर्य योजनेतील प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने निकाली काढा. त्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. या प्रकरणातील अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आशा, अंगणवाडी सेविका-मदतनीस यांची मदत घ्यावी, असे त्या म्हणाल्या.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण व्हावे यामध्ये भरोसा सेलची भूमिका महत्वाची आहे. समुदेशनासाठी वारंवार अनुपस्थित राहणाऱ्यांना पोलीस विभागाने नोटीस बजवावी. सहाय्यक कामगार आयुक्त यांनी जिल्ह्यातील अंतर्गत तक्रार निवारण समिती (आय.सी.सी.) बाबत तपासणी करावी, अशी समिती गठीत नसल्यास कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करावी. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावा. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांमध्ये महिलांसाठी स्वच्छ स्वच्छतागृहे असावीत व त्यातील दर आकारणी नियमाप्रमाणे होत असल्याची संबंधितांनी खातरजमा करावी. सर्व स्थानकांमध्ये महिलांसाठी हिरकणी कक्ष स्थापन करावेत. जिल्ह्यातील शाळांच्या ठिकाणीही मुलींसाठी स्वतंत्र शौचालये व त्यामध्ये पुरेसे पाणी ठेवावे. बेपत्ता महिलांच्या शोधासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, असे त्यांनी सूचित केले. महिलांवरील अत्याचारासंदर्भातील कायदेशीर कारवाई गतीने करावी, असेही त्या म्हणाल्या.




सांगली : जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हास्तरीय जनसुनावणी बैठकीत बोलताना बोलताना रुपाली चाकणकर, बाजूस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व इतर.

### जनसुनावणीत ८७ प्रकरणावर सुनावणी

महिला आयोग आपल्या दारी या जनसुनावणीत जिल्ह्यातील महिलांकडून प्राप्त झालेल्या ८७ प्रकरणावर सुनावणी घेण्यात आली. यामध्ये वैवाहिक, कौटुंबिकची ४५ प्रकरणे, सामाजिक ११ प्रकरणे, मालमत्ता संदर्भात ९ प्रकरणे, कामाच्या ठिकाणी छळ ३ आणि इतर १९ प्रकरणांचा समावेश आहे. या प्रकरणांची ३ समितीद्वारे सुनावणी घेण्यात आली.